# पनवेल–कर्जत सेक्शनवर दुहेरी मार्ग कॉरिडॉरच्या सामाजिक परिणामाच्या सारांशाचा मसुदा

*यांच्यासाठी*

एमयूटीपी–III प्रकल्पांसाठी आरंभिक सामाजिक व्यवस्थापन उपक्रमे

**मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन लिमिटेड**

**2017**

जागतिक बँकेसाठी **वॉयंट्स सोल्युशन्स प्रा. लि.**द्वारा बनविलेले

# 1. प्रस्तावना

## 1.1 प्रकल्प

भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची लोकसंख्या आणि रोजगाराच्या संख्येत उल्लेखनीय वाढ होण्याचे अनुमान आहे. येथे मिळणाऱ्या नोकरीच्या संधी महाराष्ट्रातील इतर भाग, तसेच देशाच्या सर्व भागांमधून या शहरात स्थलांतर करण्यासाठी मुख्य आकर्षण ठरत आहेत. मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन (एमएमआर) 4,355 वर्ग किलोमीटर्सपेक्षा अधिक क्षेत्राचा विस्तार करीत आहे. एमएमआरच्या मुल्यांकनानुसार वर्ष 2031 मधील लोकसंख्या आणि रोजगार अनुक्रमे 34.0 दशलक्ष आणि 15.3 दशलक्ष होण्याचे अनुमान आहे.

वर्ष 1951 पासून झालेली लोकसंख्येतील चौपट वाढ मुख्यत्वे उपनगरी भागात सामावली असून नोकऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण शहरी द्वीपात राहिलेले आहे. या शहराचे भौतिक वैशिष्ट्य अशा प्रकारे आहे की उपनगरी क्षेत्र केवळ उत्तर दिशेत वाढण्यास भाग पडत आहे, आणि वाहतुकीच्या सर्व सुविधा तीन अरुंद कॉरिडॉरमध्ये एकवटल्या आहेत. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट–III नवी मुंबई एअरपोर्ट इंफ्ल्यूअन्स नोटिफाइड एरिया (एनएआयएनए), बोईसर आणि पालघर यांच्या अधिक जलद आर्थिक प्रगतीस सक्षम बनवेल.

यामुळे हजारो नागरिकांना नोकरीच्या संधी मिळतील, जे अधिक जलद प्रवास करू शकतील आणि कामाच्या ठिकाणी जाण्यात आपला वेळ वाचवू शकतील. या प्रकल्पाचे ध्येय एक रेल्वे नेटवर्क बनविणे देखील आहे, ज्यात सध्या चालू असलेले मेट्रो लाईन्स सामील असून, ते प्रवाश्यांना आरंभापासून अखेरपर्यंत सोय उपलब्ध करू शकतील.

या प्रकल्पात 1) पश्चिम रेल्वेवर 63 आरकिमीचे अभिमापन केलेल्या विरार–डहाणू विभाग चौपट (तिसरे आणि चौथे लाईन्स) करणे आहे, 2) सेन्ट्रल रेल्वेवर 28 आरकिमीवर अभिमापन केलेल्या पनवेल–कर्जत विभागावर दुहेरी मार्गाचा कॉरिडॉर, 3) सेन्ट्रल रेल्वेवर 3 आर किमी मापनाचा ऐरोली–कलवाड दरम्यान उन्नत कॉरिडॉर, 4) 22 स्थानांवर मुंबईच्या उपनगरी यंत्रणेवर मध्य–विभागात अतिक्रमण नियंत्रण आणि 5) 565 ईएमयू कार्सनी (12 कार रेक्सचे 47 रेक्स) बनलेल्या अतिरिक्त रोलिंग स्टॉकची खरेदी सामील आहेत.

सध्या, पनवेल आणि कर्जत यांना जोडणारा 28.5 किमीचा एक एकेरी मार्ग आहे. ही सुविधा महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील पनवेल, खालापूर आणि कर्जत येथून जाते. यामुळे मालवाहतूक आणि काही दूरच्या अंतराच्या प्रवासी ट्रेन्सची सोय होते.

अलीकडील काही वर्षांमध्ये, विशेष करून पनवेलच्या भोवती, नवी मुंबई क्षेत्रात उल्लेखनीय शहरीकरण आणि लोकसंख्येची वाढ झाली आहे. पनवेल आणि कर्जत दरम्यानचे क्षेत्र देखील अत्यंत वेगाने विकसित होत आहे आणि कर्जतसाठी वर्धित उपनगरी ट्रेन सेवेची मागणी वाढत आहे.

प्रस्तावित मार्ग सध्या असलेल्या या सर्व स्थानकांमधून जाईल. प्रस्तावित मार्ग केवळ उपनगरी कॉरिडॉरसाठी असेल. प्रस्तावित विस्तार कार्यात या गोष्टी सामील असतील. प्रस्तावित विस्तार कार्यात अ) अस्तित्वातील सर्व स्थानकांवर प्लॅटफॉर्म्स बांधणे, ब) स्थानकांच्या इमारती बांधणे, क) विद्युत उपस्थानक बांधणे, ड) नवे स्टेबलिंग साईडिंग्ज बनविणे, ड) लेव्हल क्रोसिंगजकडे रोड ओव्हर ब्रिज (आरओबी)/रोड अंडर ब्रिजचे (आरयूबी) निर्माण करणे सामील आहेत.

## 1.2 एमयूटीपी – III प्रकल्पांची मुलभूत उद्दिष्ट्ये

मुंबई मेट्रोपॉलिटन क्षेत्राच्या उपनगरी रेल्वे यंत्रणेत सामील अस्तित्वांच्या प्रवासी वाहतूक क्षमतेस, कार्यात्मक कार्यक्षमता, आरामाचा स्तर आणि संस्थागत क्षमतेत सुधारणा करणे या प्रकल्पाची उद्दिष्ट्ये आहेत.

त्यानुसार, खालील सूचकांद्वारे याच्या कामगिरीचे संनिरीक्षण केले जाईल :

अ) व्यस्त कालावधी दरम्यान वाहन–किमीमध्ये अतिरिक्त क्षमता,

ब) व्यस्त कालावधीत जास्त गर्दी होण्याचे टाळणे,

क) प्रवासाच्या वेळा कमी करणे,

ड) कार्यात्मक कार्यक्षमताः उर्जेच्या खपतीमध्ये घट करणे.

एमयूटीपीची मुलभूत उद्दिष्ट्ये आहेतः

- मुंबई मेट्रोपॉलिटन रिजनमधील (एमएमआर) वापरकर्त्यांच्या गरजा भागविण्यासाठी, परिणामकारक संस्थेसह, नागरी वाहतूक यंत्रणेस कार्यक्षम आणि चिरस्थायी बनवित नागरी आर्थिक वृद्धीस सुकर करणे आणि मुंबईच्या नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे;

- मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट–III नवी मुंबई एअरपोर्ट इंफ्ल्यूअन्स नोटिफाइड एरिया (एनएआयएनए), बोईसर आणि पालघर यांच्या अधिक जलद आर्थिक प्रगतीस सक्षम बनवेल;

- यामुळे हजारो नागरिकांना नोकरीच्या संधी मिळतील, जे अधिक जलद प्रवास करू शकतील आणि कामाच्या ठिकाणी जाण्यात आपला वेळ वाचवू शकतील. या प्रकल्पाचे ध्येय एक रेल्वे नेटवर्क बनविणे देखील आहे, ज्यात सध्या चालू असलेले मेट्रो लाईन्स सामील असून, ते प्रवाश्यांना आरंभापासून अखेरपर्यंत सोय पुरवू शकतील;

- मुंबई कार्ससाठी, 11,000 कोटी रुपये खर्चाची एमयूटीपी–IIIला आता मंजुरी मिळाली आहे आणि हे काम वर्ष 2022 पर्यंत पूर्ण होईल. या प्रकल्पात विरार–डहाणू रोडला चौपट बनविणे, पनवेल ते कर्जत नवे उपनगरी कॉरिडॉर बनविणे आणि कळवा ते ऐरोली एक उन्नत उपनगरी कॉरिडॉर बनविणे सामील आहेत;

- या तीनही मार्गांवरील रेल्वे नेटवर्कचा विकास या क्षेत्राच्या आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून कार्य करेल. मुंबईत असलेल्या दमदार उपनगरी रेल्वे नेटवर्कच्या उपलब्धतेमुळे हे शहर देशाची वाणिज्य आणि आर्थिक राजधानी बनली आहे.

- एमयूटीपी–III प्रकल्पाच्या अंमलबजावणीसह, 300 अतिरिक्त उपनगरी सेवा सुरु केल्या जाऊ शकतील.

## 1.3 एसआयए आणि आरआणिआर उपक्रमे

वर उल्लेखित घटकांसाठी आरआणिआर टीमद्वारा खालील उपक्रमे आयोजित केली आहेत :

- प्रकल्पग्रस्त कुटुंबांची जनगणना आणि सामाजिक–आर्थिक सर्वेक्षण करणे;
- सामाजिक प्रभावाचे मुल्यांकन (एसआयए) बनविणे;
- पुनर्वसाहत कृतियोजना (आरएपी) बनविणे.

### 1.3.1 एसआयएची गरज

एक संतुलित विकास योजना, योजना आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेस मदत करेल अशा आर्थिक विकासाच्या परिणामांना ध्यानात घेते. ही परिणामांची मुल्यांकने परिणाम प्रस्तावित धोरणांच्या कृतींच्या संभाव्य सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांना, संभाव्य दुविधा आणि साहचर्य यांना ओळखण्यात मदत करतात, आणि अशा रीतीने जाणपूर्वक निर्णय घेण्यात सुलभता प्रदान करतात. आणखी, मुल्यांकनाची गरज खालील वास्तविकतांपासून उत्पन्न होतात:

- परिणामांची मुल्यांकने प्रकल्पाच्या अंमलबजावणीसह संबंधित सकारात्मक आणि चिरस्थायी निष्पत्तींना वाढवितात;
- ते निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनेक उपप्रकल्पांसह संबंधित सामाजिक आणि पर्यावरणीय विषयांच्या एकीकरणाला समर्थन देतात;
- ते सकारात्मक सामाजिक आणि पर्यावरणीय निष्पत्तींमध्ये वाढ करतात;
- स्वतंत्र उपप्रकल्प किंवा त्यांच्या एकत्रित परिणामांच्या परिणामस्वरूप ते सामाजिक आणि पर्यावरणीय प्रभावाला कमी करतात;
- ते मानवी आरोग्याचे रक्षण करतात आणि सांस्कृतिक मालमत्तेवरील परिणाम कमी करतात.

### 1.3.2 पुनर्वसाहत कमीत कमी करणे

योग्य अभियांत्रिकी रचनेद्वारा प्रकल्प क्षेत्रात लोकांवरील भूमी अधिग्रहण, पुनर्वसाहत आणि प्रतिकूल परिणामांना कमी करण्यासाठी या प्रकल्पाच्या तपशीलवार रचनेदरम्यान प्रयास करण्यात आले आहेत. प्रकल्प क्षेत्र सरकारी जमिनीत आणि जेथे शल्य असेल तेथे उपलब्ध राईट ऑफ वे (आरओडब्ल्यू) मध्ये सीमित करण्यासाठी अगोदरच पावले उचलण्यात आली आहेत. हे स्थानिक लोक आणि प्रभावित समुदायांसह योग्य सल्लामसलतीद्वारा करण्यात आले आहे. त्यांच्या सूचना तांत्रिकदृष्ट्या जेथेपण सुसाध्य असतील तेथे सामील करण्यात आल्या आहेत. प्रस्तावित कामासाठी या प्रकल्पातील पुनर्वसाहत कमीतकमी करण्यासाठी खालील ठराविक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- सरकारी जमिनीत प्रकल्प स्थान आणि त्यांच्या विविध घटकांची निवड; आणि
- विस्थापन आणि तसेच पुनर्वसाहत टाळण्यासाठी किंवा कमीतकमी होण्यासाठी योग्य अभियांत्रिकी रचना.
- जेथेही शक्य असेल तेथे लोकवस्ती किंवा इमारतींच्या संरचनेऐवजी खुल्या जागेस प्राधान्य देणे.

### 1.3.3 पुनर्वसाहत कृती योजनेची उद्दिष्ट्ये

सामाजिक परिणामांचे मुल्यांकन (एसआयए) अभ्यासात पुनर्वसाहत कृतियोजना (आरएपी) समाविष्ट असते, जी या तत्त्वावर आधारित असते, की प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रभावित लोकांना त्यांच्या राहणीमानास सुधारण्यास मदत केली जाईल. आरएपी जनगणना प्रकल्प क्षेत्रातील सामाजिक–आर्थिक सर्वेक्षण, क्षेत्रीय भेटी आणि विभिन्न प्रकल्पग्रस्त लोकांशी बैठका यांच्या सर्वसाधारण निष्कर्षांवर आधारित असले पाहिजेत. आरएपीचे प्राथमिक उद्दिष्ट प्रकल्पाच्या विभिन्न नुकसानांना कमी करण्यासाठी परिणाम ओळखणे आणि उपाययोजना करणे हे असते, आणि याची काही विशिष्ट उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

- प्रकल्पग्रस्त लोकांसाठी पुनर्वसाहत कालावधीनंतर त्यांच्या राहणीमानात सुधारणा करण्यासाठी किंवा कमीत कमी ते कायम टिकविण्यासाठी एक कृतियोजना बनविणे ;
- नुकसानभरपाईसाठी आणि उपजीविका प्रस्थापित करण्यासाठी प्रभावित लोकांसाठी हक्कांची रूपरेखा बनविणे;
- एमआरव्हीसी आणि प्रकल्पग्रस्त लोक (पीएपीएस) यांच्या दरम्यान एकोप्याचे नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी संवाद यंत्रणा विकसित करणे;
- आरआणिआरच्या शीघ्र अंमलबजावणीसाठी पर्याप्त यंत्रणेची खात्री करणे.

# 2 प्रकल्पाचे परिणाम

## 2.1 पार्श्वभूमी

पनवेल–कर्जत आखणीच्या प्रस्तावित प्रकल्प उपक्रमांमुळे स्थानिक समुदायावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांना जाणून घेण्यासाठी क्षेत्रीय भेटी आणि अभ्यास करण्यात आले होते. जमिनीवरील आखणी रेखाटनांची पडताळणी करण्यासाठी आणि प्रभावित भाग ओळखण्यासाठी व्हीएसपीएल संघाने एमआरव्हीसी अधिकाऱ्यांसह साईट्सवर भेटी दिल्या. प्रभावित क्षेत्र जाणून घेतल्यानंतर, व्हीएसपीएल आणि एमआरव्हीसी अधिकाऱ्यांनी प्रकल्प क्षेत्रात विभिन्न भागधारकांशी चर्चा केली आणि या प्रकल्पाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी बैठका आयोजित केल्या. शोधण्याची आणि या सर्वेक्षणासाठी तयार ठेवण्याची गरज असेल अशा कागदपत्रांविषयी देखील त्यांना माहिती देण्यात आली. महत्त्वाचे निष्कर्ष आणि परिणामांच्या तीव्रतेवर खालील विभागांमध्ये चर्चा केली आहे.

## 2.2 जमिनीची आवश्यकता आणि अधिग्रहण

प्रस्तावित प्रकल्पाला वेगवेगळ्या हेतूंसाठी जमिनीची आवश्यकता असेल. जमिनीचे अधिग्रहण झाल्यास प्रभावित कुटुंबांची जमीन आणि/घर आणि उत्पन्नाची संधी त्यात जाऊ शकेल. त्यामुळे खाजगी मालमत्ता/मानवी रहिवासापासून दूर आखणीद्वारे पुनर्निर्माण करत जमिनीची आवश्यकता कमीतकमी ठेवण्याचा हरसंभव प्रयास करण्यात आला आहे. नियोजनानंतर जमिनीची आवश्यकता कमीत कमी ठेवली गेली आणि खास करून, खाजगी जमिनीचे अधिग्रहण टाळण्यात आले.

**तक्ता 3.1** एकंदर प्रकल्प परिणाम दर्शवितो. कायमस्वरूपी वापरासाठी एकूण 56.490 हेक्टर्स जमिनीची गरज भासू शकते. 48.0986 हेक्टर्स जमीन खाजगी मालकीअंतर्गत असून, 3.2148 हेक्टर्स सरकारच्या ताब्यात आहे आणि 5.1500 हेक्टर्स जमीन वन विभागाकडून घेण्यात येणार आहे.

**तक्ता 3.1: जमिनीच्या स्रोतांवर परिणाम**

| अनुक्रमांक | तालुका | खाजगी | सरकार | वन | अधिग्रहण करण्याची एकूण जमीन (हेक्टर्समध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पनवेल | 15.3195 | 1.6511 | 1.4400 | 18.4106 |
| 2. | खालापूर | 25.8806 | 1.4792 | 2.2600 | 29.6198 |
| 3. | कर्जत | 6.8985 | 0.1115 | 1.4500 | 8.4600 |
| **एकूण** | | **48.0986** | **3.2418** | **5.1500** | **56.4904** |

महसूल खात्यासह केलेल्या संयुक्त मोजमापनाच्या सर्वेक्षणानंतर (जेएमएस) जमिनीचे एकूण क्षेत्र बदलू शकते. तसेच, वावरले आणि कर्जतदरम्यानचे 2 बोगदे आणि कर्जत यार्डच्या तांत्रिक व्यवहार्यतेच्या आवश्यकतेमुळे एका नव्या रचना आखणीचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, ज्यामुळे कर्जत तालुक्यातील जमिनीच्या क्षेत्रात बदल करण्यात आला आहे. वरील रचनेच्या आवश्यकतेमुळे, वावरले आणि किरावली गावांमध्ये आणि कर्जत स्थानकानजीकच्या क्षेत्रामधील, तक्ता 3.2 आणि 3.3 मध्ये दिलेल्या प्रभावित मालमत्तेची स्थिती देखील बदलली जाईल. प्रभावित संरचना, शेतजमीन आणि खुल्या जमिनीचे मालक यांच्या ओळखीची आणि पडताळणीच्या क्रिया तपशीलवार एसआयए अहवालात आखणी आणि अंतिम तपशिलांच्या सोबत प्रक्रियेत आहेत.

## 2.3 मालमत्तेच्या नुकसानाचा मालसाठा

64 खाजगी मालमत्ता प्रभावित होण्याची शक्यता आहे. एकूण मालमत्तांपैकी, 50 निवासी आहेत, 2 व्यापारी संरचना आहेत, 9 खुले भूखंड आहेत आणि 3 सीमेच्या भिंती आहेत, ज्या प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रभावित होणार आहेत. **तक्ता 3.2** प्रस्तावित प्रकल्पामुळे विभिन्न प्रकारच्या मालमत्तांवर होणाऱ्या परिणामास दर्शवितो. म्हणजेच, निवासी, व्यापारी आणि निवासी वजा व्यापारी, खुले भूखंड आणि सीमेच्या भिंती.

**तक्ता 3.2** मध्ये सर्व प्रकल्पग्रस्त खाजगी संरचनांचा आणि **तक्ता 3.3 मध्ये** ग्रस्त अशा सामाईक मालमत्ता स्रोतांचा सारांश प्रस्तुत केले आहे.

**तक्ता 3.2: परिणामग्रस्त खाजगी संरचनांचे तपशील**

| अ. क्र. | स्थानक | गाव / स्थानाचे नाव | प्रभावित मालमत्ता | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आर | सी | आर+सी | खुला भूखंड | सीमेची भिंत | |
| 1 | पनवेल | पनवेल (महानगरपालिका) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| | | उसर्ली खुर्द (ग्रामपंचायत) | 29 | 0 | 0 | 3 | 2 | **34** |
| 2 | चिखले | चिखले (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| | | भिंगार (ग्रामपंचायत) | 3 | 0 | 0 | 2 | 0 | **5** |
| 3 | मोहोपे | मोहोपे (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| | | लोधिवली (ग्रामपंचायत) | 0 | 2 | 0 | 0 | 0 | **2** |
| 4 | चौक | चौक (ग्रामपंचायत) | 18 | 0 | 0 | 4 | 1 | **23** |
| | | वावरले(ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| | | किरावली (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| 5 | कर्जत | कर्जत (महानगरपालिका) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| **एकूण** | | | **50** | **2** | **0** | **9** | **3** | **64** |

**तक्ता 3.3: प्रभावित सामाईक मालमत्तेचे तपशील (सीपीआरएस)**

| अ. क्र. | स्थानक | गाव/स्थानाचे नाव | प्रभावित मालमत्ता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | देऊळ | विहिरी | शौचालये | इतर | **एकूण** |
| 1 | पनवेल | पनवेल (महानगरपालिका) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | उसर्ली खुर्द (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| 2 | चिखले | चिखले (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | भिंगार (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 1 | 0 | **1** |
| 3 | मोहोपे | मोहोपे (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | लोधिवली (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| 4 | चौक | चौक (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 1 | 0 | **1** |
| | | वावरले (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | किरावली (ग्रामपंचायत) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | कर्जत | कर्जत (महानगरपालिका) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकूण** | | | **0** | **0** | **2** | **2** | **4** |

एकूण 4 सीपीआर्सवर परिणाम होण्याची शक्यता आहे. एकूण मालमत्तांपैकी 4 सामाईक मालमत्ता स्रोते आहेत, म्हणजेच, शौचालये आणि इतर संरचना. एकूण प्रभावित सीपीआर्सपैकी 2 शौचालये आणि 2 इतर संरचना आहेत.

## 3. सार्वजनिक माहिती आणि विचारविनिमय

### 3.1 पार्श्वभूमी

विचारविमर्शाचे महत्त्व आणि या प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रभावित किंवा विस्थापित होऊ शकणाऱ्या ध्यानात घेऊन, सार्वजनिक विचारविनिमयास सामाजिक आणि पर्यावरणीय मुल्यांकन प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग समजण्यात आला आहे. विचारविनिमयास विकासाचे निर्णय घेण्याअगोदर आणि घेतल्यानंतर प्रस्तावित कृतिविषयी भागधारकांना सूचित आणि शिक्षित करण्यासाठी एक साधन म्हणून वापरण्यात आले आहे. याला या प्रकल्पाविषयी संबंधित समस्या आणि तसेच, प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या लोकांच्या गरजा ओळखण्यात मदत होते. या सहभागी प्रक्रियेने जनतेचा प्रतिरोध कमी करण्यात मदत केली आहे आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत स्थानिक लोकांच्या सहभागास सक्षम बनविले आहे. या प्रकल्प क्षेत्रात या प्रकल्पाच्या लाभांविषयी समुदायांमध्ये जागरुकता निर्माण करत प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीस प्राप्त करण्यासाठी आणि संभाव्य अशा प्रतिकूल परिणामांना कमी करण्याच्या उद्देशाने जनतेशी आरंभिक विचारविमर्श करण्यात आला.

### 3.2 विचारविमर्शाची उद्दिष्ट्ये

विचारविमर्श प्रक्रियेची मुख्य उद्दिष्टे पीएपीजना अपेक्षित लाभ, नकारात्मक परिणाम आणि त्या सौम्य करण्याच्या प्रकल्पाच्या उपाययोजना यांच्याविषयी समजावणे आहे. प्रस्तावित पनवेल—कर्जत रेल्वे प्रकल्पाचा भाग म्हणून सार्वजनिक विचारविमर्शाची उद्दिष्टे आहेतः

- या प्रकल्पाविषयी त्याची उपक्रमे आणि कामाचा आवाका यांच्याविषयी लोकांमध्ये माहितीचा प्रसार करणे; आणि जमिनीच्या अधिग्रहणाच्या किंवा मालमत्तेच्या हानीच्या आणि त्याच्या देय नुकसानभरपाईच्या संदर्भात प्रभावित लोकांची आणि स्थानिक समुदायांची मते आणि जाणीव जाणून घेणे;
- भूमि अधिग्रहण आणि पुनर्वसाहत पर्यायांवर प्रभावित लोकांची मते जाणून घेणे आणि प्रभावित लोकांच्या अपेक्षित मागणीच्या संदर्भात विचार निर्माण करणे;
- या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस धोक्यात आणू शकतील अशी विवाद्ग्रस्त स्थानिक प्रकरणे ओळखणे;
- प्रभावी सामाजिक आणि पुनर्वसाहत योजनेस सक्षम बनविण्यास आणि त्याच्या अंमलबजावणीस सक्षम बनविण्यासाठी, महत्त्वाच्या आर्थिक आणि सामाजिक माहितीस आणि प्रकल्प क्षेत्राच्या वैशिष्ट्यांना ओळखणे आणि त्याचे मुल्यांकन करणे;
- सामुदायिक मालमत्ता आणि त्यांचे पुनर्वसन यांच्यावरील परिणामांशी संबंधित समस्या सोडविणे;
- प्रस्तावित कार्ये करण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली स्थापित करणे;
- प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान जबाबदारी आणि स्थानिक मालकीहक्काची जाणीव निर्माण करणे;
- एकंदर विकासात्मक ध्येये आणि प्रकल्पाचे फायदे यांची ओळख करून देण्यासाठी एक समझोता स्थापित करणे.

*****